# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Dhanaj**

**Date of Good Work done** :- **28/11/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे.धनज च्या 'DIAL_112' टीमची उत्कृष्ठ कामगीरी ; शिंगणापुरातून लोणीत पोहोचलेली सीमा कुटुंबियांच्या स्वाधीन.

# डायल १ १ २ च्या कर्तव्यदक्षतेमुळे वेडसर सीमा कुटुंबियांच्या ताब्यात

## नऊ तासात कुटुंबीयांना शोधण्यात धनज पोलिसांना आले यश

देशोन्नती वृत्तसंकलन...



**धनज बु** ■ पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या लोणी अरब येथे गेल्या तीन दिवसांपासून वेडसर मुलगी आढळून आल्याची माहिती डायल ११२ द्वारे धनज पोलिसांना मिळाली.

सविस्तर वृत्त असे आहे की, दिनांक २५ नोव्हेंबर च्या रात्री लोणी अरब परिसरात एक वेडसर मुलगी आढळून आल्याची माहिती डायल ११२ द्वारे धनज पोलिसांना प्राप्त झाली. त्यानव्ये धनज पोलिसांनी सदरहू घटना स्थळी जाऊन वेडसर युवतीस विचारात घेऊन तिची विचारपूस केली असता त्या मुलीने तिचे नाव व राहते ठिकाण याविषयी माहिती दिली..

सदर युवतीचे नाव सीमा पुरुषोत्तम गुलवाडे (वय३५) रा. शिंगणापूर ता. नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती येथील असून त्या युवतीचे काका नेर येथे राहत असल्याची माहिती युवतीने दिली.त्या माहितीच्या आधारे धनज पोलिसांनी नेर येथील निवासी असलेल्या काकाशी संपर्क करून तिला नेर येथे काकांचा ताब्यात दिले.वेडसरपणामुळे घरसोडून गेलेल्या सीमाच्या शोधत तिचे कुटुंब तिला शोधत असतानाच धनज पोलिसांच्या डायल ११२ च्या कर्तव्यदक्षमुळे अवघ्या नऊ तासातच सिमा ला तिच्या घरचांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात धनज पोलिसांना यश आले.ही सर्व मोहीम पोलीस निरीक्षक अनिल ठाकरे यांच्या मार्गदर्शनात पोहेकॉ.डींगाबर राठोड, नापो.निलेश जयसिंगकार, शंखर राख, दिपाली पोहरे, माधुरी कळसकर, प्रेमदास हनमुल या टीम ने केले.या डायल ११२ चे सर्वत्र कौतुक होत आहे.(वार्ता.)